// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

सत्यमेव जयते


महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission for Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 2707
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Toll Free No. 155209
E-mail : mscwmahilaayog@gmail.com


क्रमांक : ममआ-2026/व्हिरि/का-03/276
दिनांक :- 14.02.2026

## नोटीस

**विषय :- महिला सक्षमीकरणासाठी शॉर्ट व्हिडिओ आणि रिल्स तयार करण्याबाबत.**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने विविध समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यासाठी शॉर्ट व्हिडिओ तसेच रिल्स तयार करण्यात येणार आहे. महिलांविषयक कायदे, शासकीय योजना, हेल्पलाईन नंबर, महिलांच्या सहाय्यकरिता असलेल्या विविध यंत्रणांची माहिती,विविध विषयांवरील जनजागृतीपर माहिती असा आशय असलेले शॉर्ट व्हिडिओ, रिल्स तयार करण्यासाठी नामांकित व्यक्ती किंवा संस्था यांचेकडून सिलबंद लखोटयात दरपत्रक मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक असणाऱ्यांनी आपल्या लेटरहेडवर दरपत्रके आयोग कार्यालयास सादर करावी. तसेच दरपत्रकामध्ये रक्कम रुपये, जीएसटी नंबर, लागू कर आकारणी स्वतंत्ररित्या दर्शविण्यात यावी. तसेच नोटीस संदर्भातील उल्लेख करणे आवश्यक आहे.

**<u>शॉर्ट व्हिडिओ, रिल्स तयार करण्यासाठी</u>**

1. महिलांविषयक कायदे, शासकीय योजना, हेल्पलाईन नंबर, महिलांच्या सहाय्यकरिता असलेल्या विविध यंत्रणांची माहिती,विविध विषयांवरील जनजागृतीपर माहिती संकलित करणे.
2. आयोग कार्यालयाकरिता अंतिम करण्यात आलेल्या विषयांबाबत लेखन, संहिता तयार करणे, संपादन करणे, विषयानुरुप व्हिडिओ व रिल्स करिता छायाचित्रण करणे, संगीत आणि इतर अनुषंगिक कामे.
3. शॉर्ट व्हिडिओ व रिल्स याचा कालावधी साधारण 2 ते 3 मिनिटांचा असावा. असे एकूण 10 ते 12 शॉर्ट व्हिडिओ व रिल्स तयार करावयाचे आहेत.
4. लेखन, संपादन, छायाचित्रण आणि व्हिडिओ निर्मितीचे दर स्वतंत्रपणे नमूद करावे.

सदर नोटीस पत्यावर दरपत्रके दि.26.02.2026 रोजीपर्यंत दुपारी 3.00 वाजेपर्यंत सादर करावी. सदर दरपत्रके त्याचदिवशी दुपारी 3.00 वाजता उघडण्यात येतील. संबंधितांच्या अधिकृत प्रतिनिधींनी आयोग कार्यालयात उपस्थित रहावे. तरी सदर बाबतचा अंतिम निर्णय संपूर्णत: महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाकडे राखून ठेवण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- वांद्रे मुंबई

14/02/2026
प्रशासकीय अधिकारी